Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal
Impact Factor 5.3
ISSN No. 2456-1665

# भारतातील नागरीकरणाच्या समस्यांचा चिकित्सक अभ्यास

**विद्या कांबळे**
सहाय्यक प्राध्यापक
बी.एन.एन. महाविद्यालय, भिवंडी

**राहुल रमेश मंजुळे**
कला, व्दितीय वर्ष
बी.एन.एन. महाविद्यालय, भिवंडी

**प्रस्तावना :**

मानवी संस्कृतिच्या इतिहासात मुख्यत्वे तीन कारणांमूळे नागरीकरण घडून आले लोकसंख्येचा विस्फोट म्हणजेच जागतिक लोकसंख्येची वाढ ही विशेषकरून गेल्या तिनशे वर्षामध्ये फारच झपाटयाने झाली. जागतिक लोकसंख्या सुरूवातीपासून १८३० अखेर १०० कोटीपर्यत वाढली. पूढील केवळ शंभर वर्षात म्हणजे१९३० च्या सुमारास ती २०० कोटी झाली व त्यापूढील तीस वर्षात म्हणजे १९६० मध्ये ती ३०० कोटीपर्यंत वाढली. पुढील तीस वर्षात तिच्यामध्ये आणखी ४०० कोटींची भर पडेल, अस अंदाज आहे लोकसंख्येचे संकेंद्रीकरण पृथ्वीच्या पृष्ठभागावरील काही भागातच सापेक्षतेने संकेंद्रीत होऊन राहण्याची लोकांची प्रवृत्ती ही सुद्‌धा अलीकडेच विशेषत: दिसून येते कारण एकोणीसाव्या शतकाच्या अगोदर १० लक्ष किंवा अधिक वस्तीची शहरे आढळत नसत. लोकवस्ती बहूविधता संस्कृती, भाषा, धर्म, मूल्ये व वेश भिन्न भिन्न असतानासुध्दा लोकांची एकाच स्थळी समान आर्थिक व राजकीय व्यवस्थेखाली राहण्याची प्रवृत्ती ही प्रवृत्तीदेखील अलीकडेच घडून ओलल्या वाहतूक व दळणवळण क्षेत्रातील क्रांतीमूळे जगाचे जे संकोचन झाले आहे. त्यमूळे उद्‌भवली आहे. भारतातील नागरणीकरण कशाप्रमाणे घडून आहे व तसेच या नागरीकरणामुळे कोणत्या समस्या उद्‌भवल्या आहेत यांवर चर्चा करूया.

❖ **नागरीकरणाची वैशिष्टये :**

१) नागरीकरण ही सार्वत्रीक स्वरूपाची प्रक्रिया असून सफल व कालपरत्वे तिचा वेग कमी अधिक प्रमाणात दिसून येतो.

२) नागरीकरण ही हळूवाट चालणारी प्रक्रिया असली तरी तिचा वेग सर्व ठिकाणी सारखा नसतो.

३) नागरीकरण ही सदैव चालणारी बहूअंगी, परिवर्तनशील व गतीशील प्रक्रिया आहे.

४) नागरीकरण ही संकल्पना प्रचीन असली तरी औदयोगिक क्रांतीनतंर मात्र तिला आधुनिक स्वरूप प्रात्प झाले.

५) नागरीकरणामध्ये लोक कृषी व कृषीपूरक असा व्यवसाय सोडून देवून उत्पादन उदयोग, व्यापार व्यावस्थापन अशा व्यावसायात समाविष्ठ होतात.

अर्थात दुसऱ्या शब्दात सांगावयाचे झाल्यास ग्रामिण भागातून शहराकडे लोकसंख्येचे स्थलांतर म्हणजे शहरीकरण होय.

❖ **उद्‌देश :**

१) भारतातील वेगाने होणारे नागरीकरणाचे अभ्यास करणे
२) भारतातील नागरीकरणाच्या समस्यांचे विश्लेषण करणे
३) भारतातील नागरीकरणच्या प्रश्नाकडे सर्वांचे लक्ष केंद्रीत करणे

❖ **संशोधन पध्दती** :- उद्‌गामी निगमन पध्दतीचा वापर करून अनेक गोष्टीची प्रत्यक्ष पाहणी करून त्यावर आधारीत सर्वसामान्य अनुमान कढण्याचा प्रयत्न केला आहे.शोधनिबंधाचे स्वरूप अधिकाधिक येखीव करता येण्यासाठी माहिती गोळा करणे आवश्यक होते. हया जमा

केलेल्या माहितीचे विश्लेषण करण्यासाठी वर्णनात्मक पध्दतीचा वापर करण्यात आलेला आहे. संशोधनासाठी वापरलेल्या प्रथम स्वरूपाच्या साधनांनमध्ये शहरातील वस्त्यांतून भरुन घेण्यात आलेली प्रश्नावली त्यानंतर काही शहरी नागरीकांच्या व महानगरपालीका प्रशासकिय अधिकाऱ्याच्या मुलाखती घेण्यात आल्या.जेथे जेथे व्यक्तीच्या सामाजीक अंर्तमनाचा शोध घेण्याची आवश्यकता होती तेथे तेथे नागरीकरणाच्या दुष्परीणाचा अभ्यास करावा लागला. तेथे परीक्षण वध्दतीचा वापर करण्यात आला आहे.दुय्यम स्वरूपाची महिती जमा करण्यासाठी गुणात्मक संख्यात्मक दस्तकेवजांचा वापर करण्सात आला आहे.. यामध्ये शहरातील लोकसंख्या, शहरामध्ये स्थलांतरीत लोक, सोयी सुविधा, विकासाची दिशा या सर्व गोष्टीची आवश्यक खात्रीशीर आकडेवारी दस्तकेवजातून उपलब्ध होवू शकतो.

- **नागरीकरण : अर्थ :**नागरीकरण आणि शहरीकरण या एकाच अर्थाने वापरल्या जाणाऱ्या मराठी भाषेतील संज्ञा आहेत. 'Urbanization' या इंग्रजी शब्दाला मराठीत दोन पर्यायी शब्द असल्याचे दिसते. शहर या शब्दाला इंग्रजीत Urban म्हणतात. Urbanization हा शब्द Urbs या लॅटीन भाषेतील शब्दापासून तयार झालेला आहे.लॅटीन भाषेत Urb या शब्दाचा अर्थ शहर किंवा नगर असा आहे आणि या नगर किंवा शहरासंबधी Urban असा शब्दप्रयोग केला जातो. शेती आणि शेतीपूरक असा बहूतांश लोकांचा व्यवसाय असलेला लोकसमुदाय म्हणजे ग्राम किंवा गाव होय अशा गावाची सर्वांगीण प्रगती होऊन उदयोगधंदे,व्यापार व शेती या व्यतिरीक्त व्यवसाया मध्ये लोकांचा जास्तीत जास्त सहभाग होऊ लागला तसेच अनेक सेवा, सवलती, सोई निर्माण होऊ लागल्या आणि शहाराचा मुखवटा चढू लागला की त्यास 'नागरीकरण' (Urbanization) म्हणतात.

शहरीकरण किंवा नागरीकरण या संकल्पनेच्या व्याख्येसंबंधी विचारवंतामध्ये मतैक्य दिसून येत नाही हे खालील व्याख्यांवरून स्पष्ट होते.

**मार्विन ओल्सन :-** '' नागरीकरण प्रक्रियेमध्ये भोवतालच्या विस्कळीत ग्रामिण भागातून नागरी वसाहतीकडे असंख्य लोकांचे स्थलांतर होणाऱ्या प्रक्रियेस नागरीकरण म्हणात.''
**थॉम्पसन :-**''कृषी व्यवसायाशी संलग्न खेडयातील लोकसंख्या जेव्हा व्यापार, उदयोग व शासकीय व्यवहार असलेल्या मोठया समूहाकडे स्थलांतरित होतात त्या प्रक्रियेला नागरीकरण म्हणतात''
**क्लाईड मिचेल :-**''जेव्हा माठया संख्येने लोक खेडयातून शहराकडे येतात शेतीचा व्यवसाय सोडून, यंत्रोत्पादनाचा स्वीकार करतात. आपल्या सवयी बदलतात आणि तेथील अनुषंगाने आपली राहणी बदलण्यास सुरूवात करतात त्यालाच नागरीकरण असे म्हणतात''
**स्टॅम्प :-**''कृषी व्यावसायाशी संलग्न असलेल्या लहान समूदायाचे वस्तूनिर्माण उदयोग, व्यापार व्यवस्थापन व तत्सम उदयोगात असणाऱ्या मोठया समूदायाकडे लोकांचे मोठया प्रमाणावर स्थलांतर होण्याच्या प्रक्रियेला नागरीकरण म्हणतात''
**संयूक्त राष्ट्रसंघ :-**'' नागरीकरण हे ग्रामिण वसाहतींचे, व्यवसायाचे व उत्पादनाचे आणि एकूण सामाजिक जीवन पध्दतीचे स्थलांतर असते.''

- **नागरीकरणाचे स्वरूप: जागतिक स्वरूप:-** इ.स. १९५० मध्ये जगाच्या एकूण लोकसंख्येपैकी ३० टक्के लोकसंख्या शहरात राहणारी होती. वर्तमान स्थितीत जगाच्या एकूण लोकसंख्येपैकी ५० टक्के लोकसंख्या ही शहरवासी बनली आहे. एकूण लोकसंख्या व देशातील नागरीकरणाचे प्रमाण लक्षात घेता ऑस्ट्रेलिया व न्यूझीलंड हे जगात सर्वात जास्त नागरीकरण झालेली राष्ट्रे आहेत. जगात सर्वात जास्त लोकसंख्या असलेले शहर जपानची

राजधानी ‘टोकियो’ तर दुसऱ्या च तिसऱ्या क्रमांकावर अनुक्रमे न्युयॉर्क (अमेरीका) व लॉस एंजिलस (अमेरीका) दिसून येतात.

**भारतातील स्वरूप:-** इ.स. २०११ च्या जनगणने नुसार भारताची एकूण लोकसंख्या १२१ कोटी पेक्षाही अधिक आहे. एकूण लोकसंख्येपैकी ३१.१६ टक्के नागरी लोकसंख्या आहे. देशात १० लाखांपेक्षा अधिक लोकसंख्या असणारी जवळपास ५० शहरे आहेत. मुंबई हे देशात सर्वात जास्त लोकसंख्या असलेले शहर आहे. मुंबई नंतर अनुक्रमे कोलकत्ता, दिल्ली, आणि चेन्नई असा क्रमांक लागतो.

❖ **नागरीकरणाची कारणे : औदयोगिकी कारण:-** वर्तमान स्थितीत नागरीकरणाच्या प्रक्रियेला गती देणारा सर्वात महत्वाचा घटक म्हणजे औदयोगिकीकरण होय. औदयोगिकीकरण व शहर या एकाच नाण्याच्या दोन बाजू बनल्या आहेत ज्या ठिकाणी अनुकुल परीस्थिती आहे. तिथे उदयोगधंदे उभारले जातात आजूबाजूच्या ग्रामिण भागातील जनता रोजगार व व्यापार - व्यवसायानिमित्त उदयागधंदे असलेल्या शहराकडे स्थलातरित होते. भारतात मुंबई, ठाणे, कोलकत्ता, भिलाई, रूरकेला या शहरांच्या वाढीस औदयोगिकीकरण हे कारण महत्वपूर्ण ठरले आहे.

**बिगर कृषी व्यवसायाला अधिक महत्व:-** भारत हे जरी कृषीप्रधान राष्ट्र असले तरी समाजाने कृषी व्यवसायाला दृय्यम स्थान दिलेले दिसून येते. याच कारणामुळे ग्रामिण भागातील जनता व्यवसाय, व्यापार व नोकरीनिमित्त शहराकडे स्थलातरित होत आहे. गावातील स्वत:च्या मालकीची शेती असलेल्या स्वयंपूर्ण शेतकऱ्यांपेक्षा प्रशासनातील वर्ग -३ च्या कर्मचाऱ्याला अधिक प्रतिष्ठित समजले जाते. गावातील दूध उत्पादक अथवा भाजीपाला उत्पादक हा शहरातील झोपडपट्‌टीतून राहणाऱ्या ‘पिनासुया’ च्या विक्रेत्यापेक्षा कनिष्ठ समजला जातो. अशा या अनाकलनीय सामाजिक स्थ्तीमूळे नागरीकरणाची गती वाढत आहे.

**लोकसंख्येची वाढ :-**प्रचंड प्रमाणात वाढ असलेली लोकसंख्या हे शहरीकरणाचे महत्वाचे कारण आहे. कारण लोकसंख्येच्या विस्फोटामूळे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. ग्रामिण भागातील मोठा जनसमूदाय रोजगार, शिक्षण, आरोग्य इ. कारणांमूळे शहराकडे स्थलांतरीत होत आहे.

**वाहतूक व दळणवळणाच्या सुविधा :-** शहराची वाढ, विकास व विस्तार तिथल्या वाहतूक व दळणवळण व्यवस्थेवर अवलंबून असते. ग्रामिण भाग व शहर यांच्यातील अंतर कमी करणारा हा अत्यंत महत्वाचा घटक आहे. वाढलेले रस्त्यांचे जाळे, वाहतूकीची सहज व्यवस्था, सूचनाची विविध माध्यमे इ. कारणामूळे ग्रामिण जनतेला शहर जवळचे वाटू लागले आहे. शहरातील उपलब्ध होणाऱ्या विविध सोयीमूळे ग्रामिण भागातून आलेला माणूस शहरातच रमत आहे. दळणवळणाच्या साधनामूळे व्यापार व व्यवसायाचे प्रमाण वाढते. परिणामी शहरीकरणाच्या प्रक्रियेला आपोआप गती मिळते.

**व्यापार व व्यवसायाचे केंद्र :-**शहराला महत्व प्राप्त होण्याची जी महत्वाची कारणे आहेत. त्यापैकी एक शहरातील व्यापार व दळणवळणाच्या सूविधा आहेत. अशा मध्यवर्ती शहरात विविध बाजारपेठा, विविध व्यवसाय, मोठ मोठी दुकाने इ. सुविधा उपलब्ध असल्याने व्यापार व व्यवसायानिमित्त ग्रामिण जनता शहराकडे आकर्षित होत आहे.

**विविध शैक्षकणिक सुविधांचे केंद्र :-**विविध प्रकारच्या आधूनिक शैक्षणिक सूविधा शहरामध्ये उपलब्ध झाल्या आहेत. आधूनिक शैक्षणिक अभ्यासक्रम, विविध शिक्षणसंस्था, शाळा, महाविद्यालये शहरात निर्माण झाले आहेत, होत आहेत. शिक्षणाच्या निमित्ताने ग्रामिण भागातील फार मोठा जनसमूदाय शहराकडे स्थलांतरीत होत आहे. विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी वर्ग तसेच या घटकांना विविध सुविधा व व्यवस्था पूरविणारा व्यावसायिक वर्ग शहरांकडे स्थलांतरीत होत आहे.

**शहरांचे वाढते आकर्षण** :-शहरात सहजपणे उपलब्ध होणाऱ्या विविध सुखसोयी ग्रामिण भागातील जनसमुदायाला आकर्षित करण्यात कारणीभूत ठरत आहे. आरोग्य, मनोरंजन, शिक्षण, व्यापार, हॉटेल इ. घटकांमूळे शहरांचं आकर्षण वाढत आहे. परीणामी शहरांची लोकसंख्या वाढते व शहरांचा विस्तार होतो.

**भारतातील नागरीकरणाच्या समस्या**

**अमर्याद लोकांची वाढ:-** शहरीकरण किंवा नागरीकरण ही मानवाच जिवित-वित्ताशी निगडीत असलेली प्रक्रियेमध्ये अमूल्या हाच महत्वपूर्ण घटक असतो. त्यामूळे नागरीकरण होत असलेल्या शहरांमध्ये भरमसाट अनिर्बंध अणि अमर्याद लोकांची वाढ ही एक प्रमुख समस्या बनली आहे. शहरामध्ये नोकरी, रोजगार, करमणूक व उपजीविकेची साधे उपलब्ध होतात या आशेने मोठया प्रमाणत ग्रामिण भागातून शहरांकडे लोकांचे तांडे स्थलांतर करीत असतात. त्यामुळे शहरांच्या लोकसंख्येत भरमसाट वाढ होणे ही अपरिहार्य बाब आहे.

**स्थलांतराची समस्या** :-स्थलांतरही शहरीकरणामुळे निर्माण झालेली एक प्रमुख समस्या होय. मानवी इतिहासामध्ये अगदी सुरूवाती पासून स्थलांतराची प्रक्रिया अव्याहतपणे चालू असल्याचे दिसते. स्थलांतर याचा शब्दश: अर्थ एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाणे असा असला तरी सामाजिक भूगोलमध्ये स्थलांतर या संकल्पनेत दोन ठिकाणमधील अंतर जाण्याचा हेतू आणि कालावधी या तिन्ही गोष्टींना महत्व आहे. एक कायमचे निवासस्थान बदलून दुसऱ्या गावी दिर्घकालीन अथवा कायम वास्तव्यासाठी जाण्याची प्रक्रिया म्हणजे स्थलांतर होय. शहरीकरणाच्या प्रक्रियेमध्ये जसजशी शहरे विकसित होऊ लागतात तसे सभोवतालच्या खेडयापाडयातून दुर्गम प्रदेशातून विकसित प्रदेशाकडे स्थलांतर होवू लागते त्यामुळे खेडी निर्मनुष्य होवू लागतात.

**गलिच्छ वस्त्या अणि झोपडया** :- शहरीकरण किंवा नागरीकरणचा आणखी एक परिणाम म्हणजे झोपडपट्टया होय. ग्रामिण भागातील अर्थव्यवस्थेत आणि जीवनमानात कंटाळलेले तसेच शहरी जीवनाची, अर्धाजनाची, उत्तम राहणीमान, मनोरंजन इ. अभिलाषा असलेले लोक शहराकडे आपल्या सोयी वळवतात. शहरामध्ये अन्न,वस्त्र, या दोन मुलभूत गरजांची पटकन पूर्तता होते. प्रश्न असतो तो निवाऱ्याचा. लोकसंख्येच्या अमर्याद वाढीमूळे घनदाट घनतेंमूळे लोक मिळतील त्या जागेवर, फूटपाथवर, नाले, गटारांवर अतिक्रमण करून अवैध छपरे, झोपडया वसवीतच हा परीसर एवढा गुंता गुंतीचा व गजबजलेला असतो की शहर प्रशासन नियोजन करण्यास हतबल होते. पर्यायाने या वस्त्यामध्ये रस्ते, पथदिवे, गटर, सांडपाणी, दवाखाने, शाळा, आरोग्य, गुन्हेगारी, दारीद्रय असे अनेक बिकट प्रश्न निर्माण होतात यावरून गलिच्छ वस्त्या किंवा झोपडपट्टया आणि त्यामुळे राहणारा समाज ही आणि त्यांचे राहणीमान, आरोग्य ही प्रचंड माठी समस्या म्हणून भविष्यकाळात उभी राहणार आहे.

**रहिवासी जागेची समस्या** :- रहिवासी जागेची समस्या आणि झोपडपट्टीची समस्या हे दोन्ही प्रश्न परस्परांना पूरक असल्याचे दिसते. औदयोगिककरणामुळे रोजगार, व्यापार, व्यावसाय अर्थात उपजिवीकेची साधने उपलब्ध होतात. त्यामुळे ग्रामिण भागातून लोकांचे लोंढे शहराकडे वाढू लागतात. शहराचा क्षेत्रीय विकास मर्यादिल असल्यामुळे प्रत्येक कुंटूबास राहणेस जागा उपलब्ध होणे केवळ अशक्य असते. राहणेसाठी जागा मिळावी याकरिता प्रत्येकजाण प्रयत्नशील असतो आणि त्यातूनच जागेच्या किंमती वाढतात आणि अशा जागा घेणे किंवा घरे घेणे गरीब नव्हे तर मध्यमवर्गीयांना सुद्धा अशक्य होऊन बसते.

**प्रदूषणाचे संकट** :- प्रदुषण हे तीन प्रकारचे आहेत जल, वायू आणि ध्वनी प्रदूषण शहरीकरणामुळे या तीन्ही क्षेत्रात प्रचंड प्रामाणात प्रदुषण होऊन मानवी जीवन धोक्यात ओले आहे. औदयोगिकीकरणामुळे विविध रायायनिक व इतर उदयोगधंदे शहराच्या ठिकाणी निर्माण होतात व त्यातून बाहेर पडणारा द्रवपदार्थ, दूषित पाणी, रसायने, पर्यायाने प्रचंड जलप्रदुषण होते. त्याचबरोबर

कापड गिरण्या, औषधांचे कारखाने, चर्म उदयोग, सल्फर डाय ऑक्साइड धूरा बरोबर कार्बनडाय ऑक्साइड हवेत मिसळतात. बसेस, ट्रक, टॅक्सी , स्कुटर, रेल्वे इ. निघणारा धूरांचे प्रमाण प्रचंड असते. अव्याहतपणे चालू असणारे लाऊड स्पीकर्स, रेडिओ, दुरर्शन, वाहणांचे हॉर्न,फटाके यामूळे शहरामध्ये ध्वनीप्रदुषण देखील भरपूर असतो.

**सामाजिक नियंत्रणाचा प्रश्न** :- शहरीकरणामुळे उपलब्ध होणाऱ्या उपजिविकेच्या साधनांमुळे व इतर कारणांमुळे आकर्षित होऊन अनेक प्रदेश प्रातांतील भिन्न भाषिक, वांशिक व विविध जाती धर्माचे लोक शराच्या ठिकाणी एकत्र येतात. यामुळे शहरातील लोकसंख्येमध्ये सापेक्ष निरपेक्ष पध्दतीने वाढ होऊन नगरे अथवा मोठी शहरे निर्माण होतातत्र त्यातून विविध सामाजिक मुल्य व वर्तणूक बदलते व समाज नियंत्रणाच्या समस्या निर्माण होतात.

**शैक्षणिक आणि आरोग्याविषयक समस्या** :- शहरामध्ये खाजगी आणि सरकारी शिक्षण संस्था असतानाही आर्थिक परिस्थितीमुळे तेथे प्रवेश मिळत नाही. शिक्षणाचे महत्व असतानादेखील नागरी समाजामध्ये शहरीकरणामुळे गंभीर शैक्षणिक समस्या निर्माण झाले.

**नागरीकरणाच्या समस्यावर उपाय :**

सरकारांनी शहरी संसाधनाच्या शाश्वत वापरास प्रात्साहन दिले पाहिजे आणि शाश्वत वातावरणावर आधारीत अर्थव्यवस्थेला समर्थन दिले पाहिजे जसे की

१) हरित पायाभूत सूविधा
२) टिकाऊ उदयोग
३) पूर्नवापर
४) पर्यावरणीय मोहिम
५) प्रदुषण व्यवस्थापन
६) अक्षय उर्जा
७) हरित सार्वजनिक वाहतूक
८) पाण्याचा पूर्नवापर

**निष्कर्ष** :- नागरीकरण ही भारतातील एक समस्या म्हणून निर्दशनास येऊ लागली आहे. या सर्व गोष्टीमुळे नागरीकरणाच्या समस्या देखील उद्भवल्या आहेत. ज्यामुळे नागरीकरण हे जर माठया प्रमाणत झाले तर ते देशासाठी हानीकारक आहे. या नागरीकरणामुळे उद्भवलेल्या समस्याचे काही उपायाद्वारे निराकरण केले जाऊ शकते. यामुळे भारतातील नागरीकरणाच्या समस्या आटोक्यात येतील.

**संदर्भ सूची :**

१) घारापूरे विठ्ठल - सामाजिक व सांस्कृतिक भूगोल पृ . ६८
२) खडसे भा. कि. - भारतातील सामाजिक समस्या पृ . ६६
३) वैदय वसंत - भारतातील सामाजिक समस्या पृ . १५
४) भांडारकर पु.ल. - समाजशास्त्रीय सिध्दांतपृ . ३५६
५) बोंगाळे शोभा - शहरीकरणाच्या समस्या आणि नगरपालिकेचे राजकारण एम. फिल. प्रबंधपृ . १६